RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ८०]    मंगळवार, जून २५, २०२४/आषाढ ४, शके १९४६    [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक संकीर्ण १०१४/प्र.क.-१७६ (भाग-१)/ नापु-१२.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.३१) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि शासकीय अधिसूचना, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण १०१४/१३०६/प्र.क्र.-१७६/ नापु-१२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ चे अधिक्रमण करुन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दुय्यम अधिकाऱ्यांद्वारे पात्र व्यक्तींना पुरवावयाच्या, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लोकसेवा तसेच उक्त अनुसूचीच्या अनुक्रमे स्तंभ (३), (४), (५) व (६) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा लोकसेवा पुरविण्याची ठराविक कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी व द्वितीय अपीलीय प्राधिकारी अधिसूचित करीत आहे.

### अनुसूची

| अ. क्र.<br>(१) | लोकसेवेचे नाव<br>(२) | सेवा पुरविण्याची कालमर्यादा (कामाचे दिवस)<br>(३) | ज्याच्याकडून सेवा पुरविण्यात येईल तो पदनिर्देशित अधिकारी<br>(४) | प्रथम अपीलीय प्राधिकारी<br>(५) | द्वितीय अपीलीय प्राधिकारी<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन शिधापत्रिका मागणी | ३० दिवस | शिधावाटप अधिकारी/ क्षेत्रीय अधिकारी/ तहसिलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहायक नियंत्रक, शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | उप नियंत्रक, शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |



Scanned with OKEN Scanner

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २ | १. शिधापत्रिकेतील नावाची दुरुस्ती<br>२. शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे.<br>३. शिधापत्रिकेतील नाव कमी करणे.<br>४. शिधापत्रिकेवरील पत्ता बदलणे. | ३ कामाचे दिवस<br>गृह भेट आवश्यक असल्यास, ३० दिवस, अन्यथा ३ कामाचे दिवस<br>३ कामाचे दिवस<br>३० दिवस | शिधावाटप अधिकारी/ क्षेत्रीय अधिकारी/ तहसीलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहायक नियंत्रक, शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | उप नियंत्रक, शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| ३ | १. दुय्यम शिधापत्रिका (खराब/ फाटलेली इत्यादी)<br>२. दुय्यम शिधापत्रिका (शिधापत्रिका गहाळ झाल्यास) | गृह भेट आवश्यक असल्यास, ३० दिवस, अन्यथा ६ दिवस<br>३० दिवस | शिधावाटप अधिकारी/ क्षेत्रीय अधिकारी/ तहसीलदार/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सहायक नियंत्रक, शिधावाटप / अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | उप नियंत्रक, शिधावाटप / उप आयुक्त (पुरवठा) |
| ४ | नवीन रास्तभाव दुकान परवाना | उद्घोषणेनंतर १८० दिवस | नियंत्रक, शिधावाटप/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी | प्रधान सचिव/ सचिव/विभागीय आयुक्त |
| ५ | रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नूतनीकरण | ९० दिवस | उप नियंत्रक, शिधावाटप/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | नियंत्रक शिधावाटप जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ६ | किरकोळ केरोसीन विक्री परवाना | १८० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ७ | किरकोळ केरोसीन विक्रीच्या परवान्याचे नूतनीकरण | ९० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रणजीतसिंह देओल,**
शासनाचे प्रधान सचिव.

Scanned with OKEN Scanner